
दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ११८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.१० डिसेंबर २०२४




## पुढे आरोपी, मागे पोलीस पाठलागाचा थरार !
## आरोपी पाठोपाठ पोलीसही पडला विहिरीत



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, संगमनेर (नगर) :** जिल्ह्यातल्या संगमनेर तालुक्यामध्ये एक धक्कादायक आणि तितकीच आश्चर्यकारक घटना घडली. अनेक वर्षांपासून एका गुन्ह्यातील फरार असलेला आरोपी आपल्या एका नातेवाईकाकडे आला असल्याची टीप मिळाल्यानंतर पोलीस पथक त्याला पकडण्यासाठी गेले. सावध असलेल्या आरोपीला पोलीस आल्याचा सुगावा लागताच त्याने तिथून धूम ठोकली. पोलीसही त्याच्या पाठोपाठ धावले. रात्रीच्या वेळी आरोपी आणि पोलिसांचा हा पाठ शिवणीचा खेळ चालू असताना अंदाज न आल्याने आरोपी विहिरीत पडला. त्याच्या मागे पळत असलेल्या पोलिसालाही अंदाज न आल्याने तोही विहिरीत पडला. नंतर गावकऱ्यांनी दोघांनाही विहिरीतून सुरक्षितरीत्या बाहेर काढले. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत मिळालेली माहिती अशी की, संगमनेर तालुक्यातील तालुक्यातील सांगवी गावामध्ये ही घडली. जुन्या वादाच्या कारणावरून तालुक्यामध्ये २०१६ साली हाणामारी झाल्याची एक घटना घडली होती. या घटनेतील आरोपीने आपल्या मामा आणि मामीला जमिनीच्या वादातून बेदम मारहाण केली होती. त्यामुळे या आरोपीविरुद्ध पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकेच्या भीतीने आरोपी फरार झाला होता. पोलिसांनी वारंवार प्रयत्न करूनही त्यांना गुणगरा देण्यात आरोपी यशस्वी होत होता. अधूनमधून तो आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी संगमनेरमध्ये यायचा याची माहिती पोलिसांना होती. त्याच्या मोबाईलच्या लोकेशन वरून पोलिसांना त्याचा ठाव ठिकाणा लागताच त्याला अटक करण्यासाठी एक पोलिस पथक तातडीने रवाना झाले. आरोपी ज्या ठिकाणी थांबलेला होता,त्या ठिकाणी पोलिस पथकातील कर्मचारी पोहचले. आपल्याला पकडण्यासाठी पोलिस पथक आल्याची कुणकुण लागताच या आरोपीने पोलिसांना धक्का देऊन पलायन केले. पोलिस पथकाने त्याचा पाठलाग केला. एका शेतातून आरोपी पुढे पळत होता तर पोलिस पथक मागून त्याचा पाठलाग करीत होते. हा सर्व प्रकार रात्रीच्या वेळी सुरू होता. अंधारामुळे मध्येच असलेल्या विहिरीचा अंदाज न आल्याने आरोपी व त्याच्या पाठोपाठ पोलीस पथकातील एक पोलिस कर्मचारी विहिरीत पडले. विहिरीत पडलेल्या पोलिस कर्मचारी व आरोपी संगमनेर शहरातील रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती मिळाली.

## ८ वर्षांपूर्वी दिलेला शब्द पाळला !
## कोपर्डीतील पीडितेच्या बहिणीच्या लग्नासाठी हजेरी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९,अहिल्यानगर :** कोपर्डीत ८ वर्षांपूर्वी एक दुर्घटना घडली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावेळी दिलेला शब्द पाळत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्यातील संवेदनशीलतेचा परिचय दिला. त्यांनी रविवारी कोपर्डी घटनेतील पीडितेच्या बहिणीच्या लग्नाला हजेरी लावली. नगर जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या टाकळी हाजी या गावात रविवारी दुपारी हा साधा विवाह सोहळा झाला. कोपर्डी (ता. कर्जत) येथील सुद्रिक कुटुंबातील मुलीचा विवाह निघोज (ता. पारनेर) येथील वराळ कुटुंबातील मुलाशी झाला. सोयीचे ठिकाण म्हणून लग्न शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथे पार पडले. सुद्रिक यांनी आपल्या धाकट्या मुलीच्या लग्नाचे निमंत्रण फडणवीस यांना पूर्वीच दिले होते.

त्यांनी यायचे कबुल केले होते. मधल्या काळात त्यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि कारभारही सुरू केला. मात्र, लग्नाला येतो, असा शब्द त्यांनी दिला होता. तो त्यांनी पाळला आणि लग्न समारंभाला फौजफाट्याह हजेरी लावत सर्वांना सुखद धक्का दिला. आठ वर्षांपूर्वी कोपर्डीत अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व हत्या प्रकरण घडले होते. या घटनेवरून आंदोलनाची ठिणगी पडत मराठा आरक्षणाचा लढा तीव्र झाला होता. त्यानंतरच्या काळातील मराठा क्रांती मोर्चे आणि आंदोलनांनी राज्य ढवळून निघाले होते.

फडणवीस कोपर्डीतील पीडितेच्या वडिलांशी संपर्क राखून होते. भय्यूजी महाराज यांच्यामुळे हा संपर्क अधिक घट्ट झाला होता. सुद्रिक यांनी आपल्या धाकट्या मुलीच्या लग्नाचे निमंत्रण फडणवीस यांना दिले होते. त्यांनी यायचे कबुल केले होते. दिलेला शब्द मुख्यमंत्री झाल्यावरही फडणवीस यांनी पाळला. यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार राम शिंदे, प्रवीण दरेकर आदी उपस्थित होते.

**कुटुंबाला शुभेच्छा विवाहाचं निमंत्रण होतं, त्यामुळे येथे येऊन वधू वरांना शुभेच्छा दिल्या आहेत. दोन्ही कुटुंबाला आमच्या शुभेच्छा आहेत, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.**

## पंतप्रधान मोदींचा ‘मेक इन इंडिया’ पाठोपाठ आता ‘वेड इन इंडिया’वर भर



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, जयपूर :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी जयपूरमधे ९ ते ११ डिसेंबर दरम्यान होणार्या ‘रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिट’चे उद्घाटन केले. या सम्मेलनाचा उद्देश राजस्थानमधील गुंतवणूक वाढीस चालणे देणे हा असून या सम्मेलनात अनेक देशांचे प्रतिनिधी आणि आंतरराष्ट्रीय संघटना देखील सहभागी झाल्या आहेत. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ‘वेड इन इंडिया’ घोषणेचा राज्यातील पर्यटन वाढण्यास फायदा होईल असे मत मोदींनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागील काही काळापासून वेड इन इंडिया संकल्पनेवर भर देताना दिसत आहेत. देशातील नामांकित जोडपी लग्न सोहळा परदेशात आयोजित करतात. त्यानंतर सरकारकडून वेड इन इंडियाचा प्रसार केला जात आहे. याअंतर्गत बाहेरच्या देशात होणारे भारतीयांचे लग्न समारंभ देशातच केले जावेत, जेणेकरून भारतीय अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होईल असे आवाहन केले जात आहे.

राजस्थानमधील पर्यटनाच्या वाढीबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी यांनी याबद्दल भाष्य केले आहे. सम्मेलनात उपस्थित गुंतवणूकदारांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी देशातील नागरिकांना ‘वेड इन इंडिया’चे आवाहन केले आहे. याचा फायदा निश्चित राजस्थानला होईल. राजस्थानमध्ये हेरिटेज टुरिझम, फिल्म टुरिझम, इको टुरिझम, रुरल टुरिझम, बॉर्डर एरिया टुरिझम हे वाढवण्याच्या अनेक शक्यता आहेत. या क्षेत्रांमधील तुमची गुंतवणूक राजस्थानच्या पर्यटन क्षेत्राला बळ देईल आणि तुमचा उद्योग देखील वाढवेल.

**जगाला फायदा होतोय..**

देशाच्या अर्थव्यवस्थेसंबंधी बोलताना मोदी पुढे म्हणाले की, तुम्ही सगळे ग्लोबल सप्लाय आणि व्हॅल्यू चेनशी संबंधित अडचणी महिति आहेत. आज जगाला एका अशा अर्थव्यवस्थेची आवश्यकता आहे जी मोठ्यात मोठ्या संकटाच्या काळातदेखील मजबुतीने चालत राहिल. यासाठी भारतात व्यापक मेन्युफॅक्चरिंग बेस उभारणे खूप आवश्यक आहे. हे फक्त भारतासाठी नाही तर जगाच्या अर्थव्यवस्थेसाठीदेखील महत्त्वाचे आहे.

भारताने मॅन्युफॅक्चरिंगमध्ये आत्म निर्भर होण्याचा संकल्प केला आहे. भारत मेक इन संकल्पनेनंतर लो कॉस्ट मेन्युफेक्चरिंग वर भर देत आहे. भारताचे पेट्रोलियम प्रोडक्ट, औषधे आणि लसी, इलेक्ट्रॉनिक साहित्य याच्या विक्रमी मॅन्युफॅक्चरिंगमुळे जगाला मोठा फायदा होत आहे. राजस्थानमधूनही गेल्या वर्षी ८४ हजार कोटींची निर्यात झाली आहे, यामद्ये इंजीनियरींग गुड्स, जेम्स अँड ज्वेलरी, टेक्सस्टाईल, हँडिक्राफ्ट आणि शेतीसंबंधी उत्पादनांचा वाटा देखील मोठा आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

भारतात उत्पादन वाढवण्यामध्ये पीएलआय योजनेचा सहभाग देखील वाढत आहे. सध्या इलेक्ट्रॉनिक्स, स्पेशालिटी स्टील, ऑटोमोबाईल्स आणि ऑटो कंपोनंट्स, सोलार पीव्हीज, फार्मासुटीकल ड्रग्ज या क्षेत्रांमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. या योजनांमुळे किमान सव्वा लाख कोटींची गुंतवणूक आली आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

## लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार?



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, मुंबई :** राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालेलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सरकार स्थापन झालं असलं तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार बाकी आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाचा विस्तार कधी होणार? याकडे अनेकांचं लक्ष लागलेलं आहे. खरं तर राज्यात पुन्हा एकदा महायुती सरकार येण्यासाठी ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना महत्वाचं मानली जाते. मात्र, आता लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी होणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता मिळणार की नाही? याबाबतही महिलांमध्ये संभ्रम आहे.

दरम्यान, आता लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना देण्यात येणाऱ्या १५०० रुपयांचा डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? यासंदर्भातील महत्वाची माहिती समोर आली आहे. भाजपाचे नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी लाडकी बहीण योजनेसंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. तसेच लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता पुढील दोन ते तीन दिवसांत मिळणार असल्याचं सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितलं आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते.

**सुधीर मुनगंटीवार काय म्हणाले?**

आता सरकार स्थापन झालेलं आहे, सरकार अतिशय चांगलं काम करत आहे. आता लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार देखील होईल. मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर लगेचच मंत्रिमंडळाची बैठक होईल. काहीही चिंता करण्याची आवश्यकता नाही. सर्व विभाग त्यांचं काम करत आहेत. चांगले निर्णय होत आहेत. आता लाडक्या बहिणींचा हप्ता देखील पुढील दोन ते तीन दिवसांत मिळणार आहे. कुठेही काहीही अडचण नाही, असं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे.

**लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी होणार?**

विधानसभा निवडणूक निकालांना ‘कलाटणी’ देणाऱ्या ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेलाच सरकार कलाटणी देणार असल्याची सध्या चर्चा आहे. अडीच लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न तसेच घरात चारचाकी वाहन असलेल्या महिलाही या योजनेचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामुळे आता लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जांची छाननी केली जाणार आहे. छाननीनंतर नियमबाह्यपणे अर्ज बाद केले जातील, अशी चर्चा आहे. मात्र, खरंच अशी छाननी होणार आहे की नाही याबाबत आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे.

आदिती तटकरे म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवत असताना आम्ही ती योजना अगदी व्यवस्थितपणे राबवण्याचा प्रयत्न केला. २ कोटी ४० लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. कोणत्याही योजनेची एवढ्या मोठ्या संख्येने छाननी केली जाणार नाही. त्यासाठी मुळात तक्रार याव्या लागतात. मी आता त्या विभागाची मंत्री नाही.

तेव्हा अशा पद्धतीने तक्रार आली असेल तर माझ्याकडे त्याबद्दलची माहिती नाही. छाननी किंवा चाचणी करायची झाल्यास तक्रारीच्या आधारे करावी लागते. कोणी तक्रारी केल्या तर त्या तपासल्या जातील. मी मंत्री असताना अशा तक्रारी आल्या नव्हत्या. आत्ता आल्यात की नाही ते मला माहिति नाही. कोणीही अशा पद्धतीने तक्रार केली असेल तर विभागाचे आधिकारी निर्णय घेतात. आता तक्रारी आल्यात की नाही यासंदर्भातील मला माहिती नाही, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं.

## ‘राजीनामा देण्यास तयार, पण’ ; नवनीत राणांचे आव्हान स्वीकारले



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, अमरावती :** मतदानयंत्राद्वारे मतदानात गैरप्रकार झाल्याचा आरोप करत तसेच मतपत्रिकेच्या माध्यमातूनच निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीने मोहीम उघडलेली असताना भाजप आणि काँग्रेसमध्ये त्यावरून वाक्युद्ध सुरू झाले आहे.

अमरावतीचे काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे यांनी आधी राजीनामा द्यावा. त्यासोबतच बडनेराचे आमदार रवी राणा हे देखील राजीनामा देतील. मग, ही निवडणूक मतपत्रिकेच्या माध्यमातून घ्यावी, असे आव्हान भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी काल दिले होते. बळवंत वानखडे यांनी त्यावर प्रतिआव्हान दिले आहे. बळवंत वानखडे म्हणाले, नवनीत राणा यांनी मला आव्हान दिले आहे. मी ते आव्हान स्वीकारतो. मी कुठल्याही क्षणी राजीनामा देण्यास तयार आहे, पण लोकसभेची पोटनिवडणूक मतपत्रिकेवर घेण्यात येईल, असे निवडणूक आयोगाचे पत्र आपल्याला दाखवावे. लोकसभा निवडणुकीच्या काळात नवनीत राणा आणि बळवंत वानखडे यांच्यात शाब्दिक युद्ध रंगले होते. या निवडणुकीत नवनीत राणा यांचा पराभव झाला. त्यानंतर काही दिवस नवनीत राणा यांनी राजकीय मंचावर येण्याचे टाळले होते. पण विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली होती.

विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतदानयंत्राद्वारे गैरप्रकार करण्यात आल्याचा आरोप महाविकास आघाडीने केला आहे. त्यावर भाष्य करताना नवनीत राणा यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांची खिल्ली उडवली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर सर्वकाही बरोबर होते. त्यावेळी लोकशाही जिवंत होती आणि आता विरोधात निकाल आला, म्हणून लोकशाही धोक्यात आली, हा विरोधकांचा दुटप्पीपणा आहे, असे नवनीत राणा म्हणाल्या होत्या.

त्यावर भाष्य करताना नवनीत राणा यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांची खिल्ली उडवली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर सर्वकाही बरोबर होते. त्यावेळी लोकशाही जिवंत होती आणि आता विरोधात निकाल आला, म्हणून लोकशाही धोक्यात आली, हा विरोधकांचा दुटप्पीपणा आहे, असे नवनीत राणा म्हणाल्या होत्या.

खासदार बळवंत वानखडे यांनी नवनीत राणा यांचे आव्हान स्वीकारताना अट देखील घातली आहे. आपण खासदारकीचा राजीनामा आज-उद्या, केव्हाही देण्यास तयार आहोत, केवळ मतपत्रिकेवर निवडणूक घेण्याविषयीचे निवडणूक आयोगाचे लेखी पत्र त्यांनी आपल्याला दाखवावे, असे बळवंत वानखडे यांचे म्हणणे आहे. मतपत्रिकेद्वारे निवडणूक घेण्याच्या मागणीवरून सुरू झालेला हा वाद पेटण्याची चिन्हे आहेत.




## भ्रष्टाचार ; देशाला लागलेली किड

आज ९ डिसेंबर, आजचा दिवस संपूर्ण जगात भ्रष्टाचार विरोधी दीन म्हणून साजरा केला जातो. भ्रष्टाचार ही आज जगातील सर्वात मोठी समस्या बनली आहे. भारतातच नाही तर जगात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघड होत आहेत. जगात असा एकही देश नाही जिथे भ्रष्टाचार होत नाही. भारतात तर आज भ्रष्टाचार शिष्टाचार बनला आहे. जगातील सर्वात भ्रष्ट देशांच्या यादीत भारताचा क्रमांक लागतो ही खेद जनक बाब आहे. भ्रष्टाचाराची ही किड भारतात खोलवर रुजली आहे. भ्रष्टाचाराची ही किड देश पोखरत चालली आहे. भारतातील भ्रष्टाचार कमी करणार असे सर्वच राजकीय पक्ष सांगतात. देशातील भ्रष्टाचार संपवणार अशी प्रतिज्ञाच काही राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी केली होती पण देशातील भ्रष्टाचार संपवणे तर दूरच पण दिवसेंदिवस देशातील भ्रष्टाचार वाढत चालला आहे. अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील ग्लोबल फायनांशियल इंटिग्रेटी या भ्रष्टाचारावर सर्व्हे करणाऱ्या संस्थेने मागील वर्षी एक अहवाल सादर केला होता. या अहवालानुसार गेल्या सत्तर वर्षात लाचखोरीमुळे देशाचे ४५०अब्ज डॉलरचे नुकसान झाले आहे. ४५० अब्ज डॉलर ही काही छोटी रक्कम नाही. भ्रष्टाचारी लोकांनी देशाची ४५० अब्ज डॉलर पचवले. हे ४५० अब्ज डॉलर गोरगरिबांच्या मेहनतीचे होते मात्र भ्रष्टाचाऱ्यांनी खुर्ची आणि पदाचा गैरवापर करून गोरगरिबांना फसवले आणि त्यांच्या मेहनतीचे पैसे लाटले.

देशाला लागलेली ही भ्रष्टाचाराची किड आता लागलेली नाही. देशाच्या स्वातंत्र्यापासून हा भ्रष्टाचार सुरू आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू एकदा उद्विग्न होऊन म्हणाले होते की भ्रष्टाचाऱ्यांना सुळावर लटकवले पाहिजे. मात्र आजवर एकाही भ्रष्ट अधिकाऱ्याला सुळावर लटकवणे तर दूरच मात्र शिक्षा झाल्याचेही ऐकवात नाही. त्यामुळेच भ्रष्टाचार वाढत चालला आहे. दररोजचे वर्तमानपत्र वाचा त्यात तुम्हाला एक तरी भ्रष्टाचाराची किंवा लाचखोरीची बातमी वाचायला मिळेल. एका एका भ्रष्ट अधिकाऱ्याकडे कैक कोटींची अवैध मालमत्ता आढळत आहे. असा कोणताही विभाग नाही ज्यात भ्रष्टाचार होत नाही. महसूल आणि पोलीस विभाग भ्रष्टाचारात अव्वल असेल तरी सर्वच विभागात भ्रष्टाचार सर्रास चालू आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला देखील भ्रष्टाचाराने घेरले आहे. जो विभाग समाजाला नैतिकतेचे धडे देतो त्याच विभागात भ्रष्टाचारासारखे अनैतिक काम राजरोसपणे सुरू आहे.

देशातील भ्रष्टाचार कमी व्हावा यासाठी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, योग गुरू रामदेव बाबा यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्ते दिल्लीच्या जंतरमंतर वर उपोषणाला बसले होते. त्यांच्या आंदोलनाला जनतेतूनही मोठा पाठिंबा मिळाला होता. आता सत्तेत असलेल्या भाजपच्या नेत्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. देशभर भ्रष्टाचार विरुद्ध वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी देशातून भ्रष्टचार नष्ट होईल असे वाटले होते. त्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा भाजपला झाला. भाजप केंद्रात सत्तेवर आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ना खाऊंगा....... ना खाणे दुंगा..... असा इशारा भ्रष्टाचाऱ्यांना दिला. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी केली. देशातील लोकांना वाटले आता तरी भ्रष्टाचार कमी होईल मात्र तसे काही झाले नाही उलट भ्रष्टाचारात वाढच झाली. त्यातही गंमत म्हणजे ज्या भ्रष्टाचाऱ्यांना विर ोध करून भाजप सत्तेत आली आज त्याच भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेऊन भाजप पावन करत आहे.

ट्रेस मेट्रिक्स २०२१ च्या अहवालात भारत लाचखोरीत इतर देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे. याचाच अर्थ देशातील भ्रष्टाचार कमी झाला नाही.

आज कोणत्याही सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय काम होत नाही. दररोजचे वर्तमान पत्र उघडले की एक तरी लाचखोरीची बातमी वाचायला मिळतेच. जनताही मजबूर आहे. याच मजबुरीचा फायदा घेऊन लाचखोर त्यांनाच जाळ्यात अडकवत आहे. लाच दिली नाही तर काम होत नाही असाच अनुभव देशातील बहुतांश जनतेला आला आहे. राजस्थानमधील ८० टक्के लोकांनी हे मान्य केले आहे की कोणतेही काम करण्यासाठी लाच द्यावीच लागते. महाराष्ट्रातील ५५ टक्के लोकांचे हेच म्हणणे आहे. याचाच अर्थ लाचखोरी सामान्य होत आहे. पूर्वी भ्रष्ट्राचाऱ्यांकडे द्वेष भावनेने पाहिले जाते होते. आता मात्र त्यांच्या संपत्तीवरून त्यांचा सन्मान होत आहे. आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे.

# आल्फ्रेड नोबेलच्या मृत्युपत्राप्रमाणे पुरस्कार

नोबेल पारितोषिक हा जगातील अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, साहित्य, जागतिक शांतता, वैद्यकशास्त्र वा जीवशास्त्र आणि अर्थशास्त्र या पाच क्षेत्रांतील अतुलनीय कामगिरी किंवा संशोधन यासाठी प्रतिवर्षी हा पुरस्कार दिला जातो. स्वीडिश वैज्ञानिक आल्फ्रेड नोबेल यांनी आपल्या मृत्युपत्रात या पुरस्कारांची तरतूद केली होती. त्याच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी इ.स.१९०१मध्ये पहिल्यांदा हा पुरस्कार देण्यात आला. दरवर्षी १० डिसेंबर रोजी हा पुरस्कार दिला जातो. सन १९४०-४२पर्यंत दुसऱ्या महायुद्धामुळे हा पुरस्कार खंडित करण्यात आला होता. डिसेंबर २०२०पर्यंत एकूण ९२९ व्यक्तींना आणि २५ संस्थांना एकूण ९५४ नोबेल पारितोषिके देण्यात आली आहेत. इ.स.१९६९पासून आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ स्वीडनच्या मध्यवर्ती रिक्स बँकेने अर्थशास्त्रातील मौलिक कार्यासाठी सहावे नोबेल पारितोषिक देण्यास सुरुवात केली. आल्फ्रेड नोबेलच्या मृत्यूनंतर इ.स.१८९७ साली त्यांचे मृत्युपत्र उघडून पाहण्यात आले व चार वर्षांनंतर ते कायदेशीर असल्याचे सिद्ध झाले. या मृत्युपत्रानुसार त्याने कमावलेल्या अमाप संपत्तीचा मोठा हिस्सा- ३.१ कोटी स्वीडिश क्रोनार नोबेल निधीसाठी ठेवलेला होता. हा निधी सुरक्षित ठेवींत गुंतवा आणि मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ६०-७० टक्के रकमेचे पाच सारखे भाग करून प्रत्येक क्षेत्रातील पारितोषिकासाठी द्या, असे त्यांनी आपल्या मृत्युपत्रात सुचविले होते.

कायदेशीरपणे नमूद केलेल्या व पारितोषिके देणाऱ्या संस्थांनी नेमून दिलेल्या व्यक्तीच पारितोषिकांसाठी उमेदवारांची नावे सुचवू शकतात. स्वतःच आपले नाव सुचविल्यास ती व्यक्ती आपोआपच पारितोषिकासाठी अपात्र ठरते. उमेदवारांची नावे सुचविण्यासाठी पुढील व्यक्ती पात्र असतात- आधीचे नोबेल पारितोषिक विजेते. पारितोषिके देणाऱ्या संस्थांचे सभासद. काही विशिष्ट विद्यापीठांचे आणि महाविद्यालयांचे तसेच पारितोषिके देणाऱ्या संस्थांनी खास निमंत्रित केलेले त्या त्या क्षेत्रातील प्राध्यापक. साहित्याच्या पारितोषिकासाठी लेखकांच्या काही प्रातिनिधिक संघटनांचे सभासद. दि स्वीडिश अकॅडमीशी तुल्य अशा संस्थांचे सभासद. शांततेच्या पारितोषिकासाठी आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या काही संसदीय व इतर संस्थांचे सभासद उमेदवारांची शिफारस करू शकतात. उमेदवारांच्या नावाची शिफारस केवळ व्यक्तीलाच करता येते, संस्थेला नाही. मात्र अनेक पात्र व्यक्ती संयुक्तपणे शिफारस करू शकतात. पारितोषिके देणाऱ्या संस्थांकडून पात्र व्यक्तींना नावे सुचविण्याविषयी विनंतीपत्रे पाठविली जातात. त्यांनी संबंधित कागदपत्रांसह आपल्या शिफारशी १ फेब्रुवारीच्या आत पाठवायच्या असतात. १ फेब्रुवारीपासून नोबेल समित्यांचे काम सुरू होते व सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये समित्या आपल्या शिफारशी पारितोषिके देणाऱ्या संस्थांकडे पाठवितात. या संस्था १५ नोव्हेंबरपर्यंत अंतिम निर्णय जाहीर करतात. नावे सुचविली जाण्यापासून ते अंतिम निर्णयापर्यंत होणारे वादविवाद, चर्चा, मतदान आदी बाबतीत गुप्तता राखली जाते. नोबेल पारितोषिकांच्या निर्णयाविरुद्ध दाद मागता येत नाही. साधारणतः ३००० लोक पुरस्कारासाठी नामांकने पाठवतात. त्यापैकी नोबेल समिती फक्त ठरावीक नामांकनेच निवडते.





- संकलन व सुलेखन -
कृष्णकुमार निकोडे गुरुजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.


आल्फ्रेड नोबेलच्या मृत्युपत्रान्वये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व अर्थशास्त्र यांतील पारितोषिके दि रॉयल स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेसकडे, वैद्यकशास्त्राचे दि रॉयल कॅरोलिन मेडिको-सर्जिकल इन्स्टिट्यूटकडे, साहित्याचे दि स्वीडिश ॲकॅडमीकडे आणि शांततेसाठी नॉर्वेच्या संसदेने- स्टोर्टिंगने नेमलेली दि नॉर्वेजियन नोबेल कमिटी या चार संस्थांकडे ही पारितोषिके देण्याचे अधिकार आहेत. पारितोषिकासंबंधीचा निर्णय घेण्याचे व जाहीर करण्याचे काम या संस्था करतात. पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यास प्रत्येक संस्थेच्या मदतीसाठी तीन ते पाच सदस्यांची समिती असते. या समित्या गरज भासल्यास इतर तज्ज्ञांनाही चर्चेसाठी बोलावू शकतात. पारितोषिकासाठी सुचविण्यात आलेल्या उमेदवाराच्या कार्याचे मूल्यमापन करून या समित्या आपला निर्णय देतात, पण हा निर्णय मानणे संस्थांवर बंधनकारक नसते. मृत्युपत्रातील तरतुदीनुसार नोबेल प्रतिष्ठान स्थापण्यात आले असून ही संस्था नोबेल निधीची कायदेशीर मालक आहे. वरील चार संस्थांच्या सहकार्याने ही संस्था सर्व प्रशासकीय कामे संयुक्तपणे पाहते. इतर सर्व नोबेल संस्था प्रतिष्ठानच्या नियंत्रणाखाली आहेत. मात्र पारितोषिकांच्या निवाड्याशी आणि त्यासंबंधीच्या कार्याशी प्रतिष्ठानचा काहीही संबंध नसतो.

त्यांच्या सरकारतर्फे हा पुरस्कार नाकारण्याचे आवाहन करण्यात आल्यामुळे चार व्यक्तींनी हा पुरस्कार नाकारला होता. यापैकी तीन जर्मन हिटलरमुळे, तर चौथी व्यक्ती रशियन लेखक बोरीस पास्तेर्नाक यांनी साहित्यातील नोबेलमुळे आपले सरकार सूड उगवेल या भीतीपोटी हा पुरस्कार नाकारला. उत्तर व्हियेतनामच्या लु डक थो याने शांततेचा नोबेल हा शांतता प्रस्थापित न झाल्यामुळे नाकारला होता, हे येथे उल्लेखनीय!

# संजय मल्होत्रा आरबीआयचे नवे गव्हर्नर, पुढील तीन वर्षे असेल कार्यकाळ

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांची निवड करण्यात आली आहे. ११ डिसेंबर पासून पुढील तीन वर्षांसाठी त्यांचा कार्यकाळ असणार आहे. कॅबिनेटच्या समितीने त्यांची महसूल सचिव पदी असलेल्या संजय मल्होत्रा यांची निवड रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी केली आहे. अछख या वृत्तसंस्थेने हे वृत्त दिलं आहे.

**कोण आहेत संजय मल्होत्रा?**

सध्याचे रिझर्व्ह बँकेचे गवर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ उद्या, १० डिसेंबर रोजी संपत आहे. संजय मल्होत्रा हे १९९० च्या राजस्थान कॅडरचे खअड अधिकारी आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये ते आरईसीचे चेअरमन आणि एमडी या पदावर नियुक्त झाले. त्याआधी ते उर्जा मंत्रालयात अतिरिक्त सचिव पदावर कार्यरत होते. २०२२ मध्ये डिपार्टमेंट ऑफ फायनान्शियल सर्व्हिसेसचे सचिव या पदावर ते कार्यरत होते. संजय मल्होत्रा यांना केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेच्या संचालक पदीही नियुक्त केलं होतं. आता त्यांना आरबीआयचे गव्हर्नर हे पद देण्यात आलं आहे. पुढील तीन वर्षांसाठी त्यांचा कार्यकाळ असणार आहे.

**संजय मल्होत्रा ११ डिसेंबरपासून स्वीकारणार पदभार**

संजय मल्होत्रा हे महसूल सचिव या पदावर कार्यरत आहेत.

मल्होत्रा यांची आता रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नियुक्ती झाली आहे. पुढील तीन वर्षांसाठी ते हे पद सांभाळतील.

संजय मल्होत्रा हे १९९० बॅचचे राजस्थान केडरचे खअड (भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी) आहेत.

त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,



कानपूर येथून कॉम्प्युटर सायन्समध्ये अभियांत्रिकी पदवी घेतली आहे.

मल्होत्रा यांनी प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी, यूएसए येथून पब्लिक पॉलिसी या विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे.

संजय मल्होत्रा हे १९९० च्या बॅचचे आणि राजस्थान केडरचे सनदी अधिकारी आहेत. त्यांनी कानपूरमधून कंप्यूटर विज्ञान मध्ये अभियांत्रिकीची पदवी मिळवली आहे. याशिवाय त्यांनी अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठातून सार्वजनिक धोरणात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. संजय मल्होत्रा

यांनी ऊर्जा, वित्त आणि कर, माहिती तंत्रज्ञान, खाणी इत्यादींसह विविध क्षेत्रांमध्ये काम केले आहे. सध्या ते अर्थ मंत्रालयात सचिव (महसूल) आहेत. त्यांनी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत वित्तीय सेवा विभागात सचिवपद भूषवले होते. संजय मल्होत्रा (डरपक्षरू चरश्रहेंॲर) यांना राज्य आणि केंद्र सरकारमधील वित्त आणि कर आकारणी या क्षेत्राचा मोठा अनुभव आहे. ते प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांच्या संदर्भात कर धोरण तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

**समर्थ..**

करता नाम स्मरण
सद्गुरु श्री समर्थ
कळेलं जीवन सार
जगणे असे किमर्थ

भोग भोगून संपवा
प्रयास हवे बिनशर्थ
भक्तीभावा मार्गस्थ
मार्गक्रमण बिनशर्त

सत्संग पथ अनुसरे
पंथ लाभला यथार्थ
माहिती नसे परलोक
स्वामीमंदिर हे पुमर्थ

समस्त सिमा बंदिस्त
भक्तीपथाचा अन्वर्थ
स्वामीकृपा होईजशी
जाणला रे मतितार्थ

जीवन हे कशा साठी
प्रश्न मंजुषा कित्यर्थ
स्वामीपादुका सन्निध
जाणिला भक्ती अर्थ

संसार सागर लांघता
कळे आयु मतितार्थ
निर्वाणसमयीसुखार्थ
स्वस्थ संतोष कृतार्थ

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी


# सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

## निधी संकलनात अमुल्य योगदान द्यावे - जिल्हाधिकारी पांचाळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, जालना :** भारत देशाच्या संरक्षणासाठी आपले वीर सैनिक देशाच्या सिमेवर कोणत्याही वातावरणात आपली सेवा निष्ठेने बजावत असतात. सैनिक अत्यंत कठीण वातावरणासह परिस्थितीला सामोरे जावून देशाच्या सिमेचे दिवसरात्र संरक्षण करत असतात. तरी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अधिकाऱ्यांसह नागरिकांनी राष्ट्र प्रेमाची भावना मनात ठेवून ध्वजदिन निधी संकलनात आपले अमुल्य योगदान द्यावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ जालना येथील सैनिकी लॉन्सवर पार पडला. यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी महापालिका उपायुक्त नंदा गायकवाड, सेवानिवृत्त स्क्वॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ.रुपाली सरोदे, जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक योगेश सारणीकर, शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले की, आपले सैनिक सिमेवर खडा पहारा देत असल्याने आपण देशांतर्गत निर्भय जीवन जगत असतो. लोकशाहीचे मूल्य अबाधित ठेवण्यास तसेच देशाच्या प्रगतीत सैनिकांचा मोलाचा वाटा आहे. जो देश आर्मी व मिल्ट्रीचा चुकीचा अवलंब करतो तो देश कधीही प्रगती करु शकत नाही. नवीन पिढीला सैनिकांच्या भावना समजण्यासाठी शाळेतील विविध कार्यक्रमात एखादा भाग सैनिकांवर आधारित ठेवण्यात यावा. नागरिकांनी




सार्वजनिक जीवनात सैनिक, माजी सैनिकांसह वीर माता, वीर पिता, वीर पत्नी यांचा नेहमी आदर करावा. असे सांगुन सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचे गेल्या वर्षी दिले गेलेले उद्दीष्ट सर्व कार्यालय प्रमुखांनी पुर्ण केले त्याबद्दल अभिनंदन करत चालु वर्षाची उद्दीष्टपूर्ती करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचा सैनिकांच्या कल्याणकारी योजनांसाठी वापरण्यात येत असतो. जालना जिल्ह्याला सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचे दिले गेलेले उद्दीष्ट २२१ टक्के पुर्ण केले आहे. सर्वांनी सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास मदत करावी. असे सांगून सशस्त्र सेना ध्वजदिन निधीचे महत्व प्रास्ताविकातून सेवानिवृत्त स्क्वॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. रुपाली सरोदे यांनी समजावून सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने व शहिदांना आदरांजली अर्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गोविंद इंगोले यांनी करुन आभार मानले. पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांनी हम सब भारतीय है..! हे संगीतबध्द गीत सादर केले.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच मागील वर्षी उत्कृष्ट निधी संकलन केलेल्या कार्यालय प्रमुखांचा गौरवही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास माजी सैनिकांसह वीर माता, वीर पिता, वीर पत्नी, एनसीसी, पार्थ सैनिकी शाळेतील विद्यार्थी, नागरिक, विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वर येथे शिवप्रताप दिन साजरा



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.९, महाबळेश्वर :** किल्ले प्रतापगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजल खान याचा वध केला होता. या स्मृती पित्यार्थ महाबळेश्वर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवप्रताप दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीला पुष्पहार अर्पण करून वंदन आले. त्यानंतर नगरपालिका महाबळेश्वर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. अंबिका नामदेव सोसायटी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष श्रीकांत जांभळे, सचिव राहुल शेलार, खजिनदार शुभम कुंभारदरे, कार्याध्यक्ष स्वरूप देवकर, संतोष साळुंखे, राजा गुजर, संजय ओंबळे, राहुल भोसले, आकाश साळुंखे, पंकज येवले, सचिन काळे, ओंकार येवले, शंकर ढेबे, दत्तात्रय बावळेकर, राहुल वाडकर, दिपक ताथवडेकर, सुशांत पारठे तसेच मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

## गुडसुर येथे आ.संजय बनसोडे यांना मंत्रीपद मिळावे म्हणून साकडे



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि०९, उदगीर (लातूर) :** उदगीर विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते विकास पुरुष आ. संजय बनसोडे यांची महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात पुन्हा एकदा मंत्री मंडळात संधी मिळावी म्हणून गुडसुर येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्यकर्ते व गुडसुरचे उपसरपंच बालाजी देमगुंडे यांच्या वतीने गुडसुर येथील महादेव मंदिरात अभिषेक व आरती करुन प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना उपसरपंच बालाजी देमगुंडे यांनी उदगीर मतदार संघाची ओळख महाराष्ट्रामध्ये केवळ आ.संजय बनसोडे यांच्या मागील पाच वर्षाच्या विकास कार्य मुळे झाली असून उदगीरच्या विकासाचा रथ असाच पुढे सुरू ठेवण्यासाठी उदगीर, जळकोट मतदार संघाचे आ. संजय बनसोडे यांना पक्षश्रेष्ठींनी पुन्हा एकदा मंत्रीपदाची संधी देऊन त्यांचा सन्मान करावा. अशी अपेक्षा बालाजी देमगुंडे यांनी व्यक्त केली आहे.

यावेळी उत्तम सूर्यवंशी अशोक मुस्कावाड, रमा सावकार जगळपुरे, बाळू मरलापल्ले, रोप थोडगे शैलेश देमगुंडे, दिगंबर देमगुंडे, ज्ञानेश्वर पारशेवार, कपिल डाके, गजानन भारकड, प्रकाश कुलकर्णी, पिंटू गुनाले, लक्ष्मण सूर्यवंशी, सुभाष सूर्यवंशी, अशोक शिळे, मुन्ना देमगुंडे, रामकिसन बिरादार, संगम बंडे तोटकर, विश्वनाथ आप्पा स्वामी आदी उपस्थित होते.

## अमंली पदार्थांची विक्री व वाहतूक रोखण्यासाठी जिल्ह्यातील यंत्रणांनी सक्रिय सहभाग नोंदवावा



**दि.०९, ठाणे :** समाजात अंमली पदार्थांचा वापर टाळण्यासाठी व युवा पिढीला अंमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी सर्व यंत्रणांनी सक्रिय सहभागी व्हावे. ठाणे जिल्ह्यातील रासायनिक कंपन्या,परदेशातून येणारी पार्सल,गांजाची लागवड होणारी ठिकाणी आदी ठिकाणांवर लक्ष ठेवून वारंवार तपासणी करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांनी आज येथे दिले.जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कृती समितीची बैठक आज डॉ. माने यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडली. यावेळी अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक रोखण्यासाठी कडक पावले उचलण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी ठाणे ग्रामीणचे प्रभारी पोलीस उप अधीक्षक (गृह) तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर,

ठाणे पोलीस आयुक्तालयाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहूल म्हस्के, मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाचे पोलीस निरीक्षक अमर मराठे, नशाबंदी मंडळाचे रविंद्र गुरचळ यांच्यासह अन्न व औषध प्रशासन, कृषि, टपाल विभाग, औद्योगिक सुरक्षा विभाग, शिक्षण विभाग, वन विभाग व शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

ठाणे ग्रामीण पोलीसांनी सन २०२४ मध्ये सुमारे २ लाख ३७ हजार रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. तर मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालयाच्या पथकाने अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध एकूण १४७ गुन्हे दाखल केले असून १७७ आरोपींना अटक केली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालय व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयानेही अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कडक पावले उचलली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

डॉ. माने म्हणाले की, जिल्ह्यात अंमली पदार्थांना आळा घालण्यासाठी बंद कारखाने/गोडावून, रासायनिक कंपन्या, व्यसनमुक्ती केंद्रे यांची तपासणी करून अहवाल सादर करावा. ज्यांच्याविरुद्ध एनडीपीएस अंतर्गत गुन्हे दाखल आहेत, अशांची माहिती एकत्रित करून त्यांच्यावर लक्ष ठेवावे. अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्या परदेशी नागरिकांवर विशेष लक्ष ठेवावे. तसेच कुरिअर, टपालामार्फत बाहेरून येणाऱ्या पार्सलची तपासणी करण्यात यावे.समाजातील अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक रोखण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे तसेच ग्रामीण भागात जनजागृती मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे. यासाठी सर्व विभागाने सक्रिय सहभाग घ्यावा,असे आवाहन डॉ. माने यांनी यावेळी केले.

# बांगलादेशी हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात निषेध आंदोलन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.९, शिळफाटा (ठाणे) :** दि.८ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत शिळफाटा जंक्शन नाक्यावर सकल हिंदू समाजाकडून बांगलादेश मधील हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये शिळ, डायघर, देसाई, दहिसर विभागातून हजारोच्या संख्येने नागरिक या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते.

बांगलादेशातील मुस्लिम कट्टरतावाद्यांकडून हिंदू आणि अन्य अल्पसंख्यांक समुदायांवर गंभीर अम




ानवीय अत्याचार केले जात आहेत. या अत्याचाराच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. ह्या आंदोलनात शीळ, डायघर, देसाई तसेच दहिसर (१४ गाव) विभागातील जवळजवळ ३०० च्या वर महिला, ७०० पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित कार्यकर्ते यांनी बांगलादेश सरकार विरुद्ध घोषणा देवून तसेच निषेध फलक दाखवून आपला रोष व्यक्त केला. ह्या आंदोलनात सर्व हिंदुत्ववादी संघटना, सर्व पक्षीय कार्यकर्ते, गावकरी मंडळी, वारकरी संप्रदाय, हरे रामा हरे कृष्णा, हे सर्व हिंदू म्हणून एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळाले. सदर आंदोलनाच्या माध्यमातून बांगलादेश आणि भारत या दोन्ही देशातील सरकारांना बांगलादेश मधील हिंदूंना आणि मंदिरांना संरक्षण द्यावे व त्यांच्यावर होणारे अत्याचार तात्काळ थांबावे अन्यथा आम्हाला देखील काही पाऊले उचलावी लागतील असा इशारा वजा मागणी वक्त्यांनी त्यांच्या भाषणावेळी केली.

# विकासाला विरोध करणाऱ्या अदृश्य शक्ती संपुष्टात आल्याशिवाय उन्नतीची गाडी रुळावर येणार नाही

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.९, माथेरान :** पूर्वीपासूनच माथेरानमध्ये विकासाला गती देण्याऐवजी विरोध करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात आहेत असे हे एकमेव स्थळ असावे.

किंबहुना तीन ते चार पिढयांनी इथे वास्तव्य केलेले असताना सुध्दा भावी पिढीला उदयोन्मुख विकासाकडे नेण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असताना गावातील काही संकुचित बुद्धीच्या मंडळींनी आणि मुंबईत राहून माथेरान बाबत पोकळ सहानुभूती दाखविणाऱ्या धनाढ्य लोकांनी नेहमीच इथे होणाऱ्या विकास कामांना विरोध दर्शवून इथल्या सर्वसामान्य लोकांना आपापल्या व्यवसायात धन्यता मानन्यासाठी एकप्रकारे भाग पाडले आहे. मुंबईतील हे धनाढ्य लोक वर्षातून केव्हातरी येथे हजेरी लावतात त्यांना इथली परिस्थिती, इथल्या लोकांच्या जनजीवनाबाबत सुतराम कल्पना नसताना देखील माथेरान आहे तसेच ठेवावे असाच त्यांचा मानस आहे. इतर पर्यटन स्थळांवर आधुनिक युगाप्रमाणे नवनवीन बदल घडवून आणण्यासाठी तेथील स्थानिक लोक शासन दरबारी पुरेपूर प्रयत्न करत असतात.

आजमीतीपर्यंत या ठिकाणी येण्यासाठी नेरळ मार्गे माथेरान हाच एकमेव मार्ग आहे इथे पर्यायी व्यवस्था उपलब्ध व्हावी वाहतुकीची समस्या मार्गी लागावी यासाठी प्रयत्न केल्यास



गेली ६ महिने झाले आम्ही माथेरान मधील पर्यटक आणी स्थानिक लोकांना सेवा देत आहोत. त्याच बरोबर येथील तिनही शाळेतील विद्यार्थ्यांना आणी शिक्षक यांना उत्तमरित्या सेवा देत आहोत. यामध्ये असे दिसून येत आहे की, जे लोक ई रिक्षाला विरोध करत होते ते या सेवेचा सर्वात जास्त वापर करत आहेत आणि दुसरीकडे विरोधही करत आहेत. त्यांना विनंती आहे की जर त्यांना या सेवेचा लाभ घ्यावा असे वाटत असेल तर त्यांनी जाहीर पाठींबा द्या दुटप्पी भूमिका घेऊन संघटनेला त्रास देऊ नये.

**- शैलेश भोसले (ई-रिक्षा चालक)**

जे रिक्षा विरोधक आहेत त्यांना जराही स्वाभिमान असेल तर त्यांनी एकतर रिक्षाला विरोध करावा नाहीतर ई-रिक्षाला पाठिंबा तरी द्यावा. उगाच येड्याच सोंग घेऊन दोन्ही दगडावर पाय ठेऊ नये. आणि जे रिक्षाला विरोध करतात त्याच माणसांना ईरिक्षा अगोदर हवी असतें. त्यामुळे त्यांनी एकतर खुला विरोध करावा नाहीतर पाठिंबा तरी द्यावा.

**- निखिल शिंदे (सामाजिक कार्यकर्ते, माथेरान)**

काही मुठभर लोक नेहमीच विकासाला खोडा घालण्यासाठी पुढाकार घेताना दिसतात. मागील काळात इथे पर्यायी व्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांच्या प्रयत्नातून एमएमआरडीएच्या माध्यमातून फिनिक्युलर सारखा महत्वकांक्षी प्रकल्प मार्गी लागणार होता त्यावेळेस सुद्धा तालुक्यातील काही जबाबदार लोकप्रतिनिधींनी केवळ मतांसाठी या प्रकल्पाला विरोध दर्शविल्यामुळे ही पर्यायी व्यवस्था होऊ शकली नाही.१८५० मध्ये माथेरानचा शोध लागल्यानंतर ते

आजमीतीपर्यंत या ठिकाणी ब्रिटिश गुलामगिरीप्रमाणे हातरिक्षा ओढण्याचे काम पिढ्यानपिढ्या काही श्रमिक मंडळी करीत आहेत. त्यांना या अमानविय प्रथेतून कायमस्वरूपी मुक्ती मिळावी यासाठी हातरिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे यांनी १२ वर्षांपासून शासन दरबारी पाठपुरावा केल्यानंतर या ठिकाणी ई रिक्षा सुरू करण्यात आली आहे.

त्यामुळे सद्यस्थितीत ई रिक्षाच्या सेवेमुळेच मागील वर्षापासून याठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होताना दिसते. आणि याच माध्यमातून सर्वांनाच चांगल्या प्रकारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होताना दिसत आहेत. ई-रिक्षाला जरी ठराविक मंडळींचा विरोध असला तरी सुद्धा हीच मंडळी स्वतः आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य ई रिक्षाचा मोठया प्रमाणावर वापर करताना दिसत आहेत. रात्री अपरात्री दस्तुरी येथून गावात येण्यासाठी ई रिक्षाचाच सरासपणे वापर करतात.काही धूर्त राजकीय मंडळी ई रिक्षाला विरोध करणाऱ्यांना पाठीशी घालत असून स्वतः मात्र या सेवेचा सर्रासपणे लाभ घेत आहेत. त्यामुळे ज्यांना खरोखरच ई रिक्षाला विरोध करायचा आहे त्यांनी स्वाभिमान बाळगून या सेवेचा लाभ घेऊ नये असे ई रिक्षा समर्थकांचे म्हणणे आहे.

# लोकसाधनेच्या हायस्कुलला मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सदिच्छा भेट

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि०९, दापोली (रत्नागिरी) :** रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पुजार यांनी दापोली तालुक्यातील चिखलगाव येथील लोकमान्य पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट (लोकसाधना) संचलित लोकमान्य टिळक विद्यामंदिर व ज्युनियर कालेजला नुकतीच सदिच्छा भेट दिली.

जिल्हा परिषद रत्नागिरी, पंचायत समिती दापोली व निर्मल ग्रुप ग्रामपंचायत चिखलगाव यांचे संयुक्त विद्यमाने मिशन बंधारे २०२४ अंतर्गत मळे येथे श्रमदान आणि लोकसहभागातून बंधारे बांधण्याच्या कार्यक्रमासाठी ते चिखलगावला आले होते. ही सदिच्छा भेट चिखलगाव ग्रामपंचायतीचे सरपंच आणि लोकसाधना संस्थेचे विश्वस्त दिनेश आडविलकर




यांच्या माध्यमातून घडून आली. यावेळी लोकसाधनाचे विश्वस्त अड. कैवल्य दांडेकर यांनी शाळा आणि संस्थेच्या विविध उपक्रमाविषयी त्यांना अधिक माहिती दिली. तसेच या संस्थेचे वेगळेपण असलेल्या टेक्निकल विभागालाही त्यांनी आवर्जून भेट दिली. या विभागात आयआयटी पवई आणि आय आय एम बंगलोर यांच्या सहभागातून चाललेल्या कामाची त्यांनी अधिक माहिती जाणून घेतली. ग्रामीण भागात चाललेल्या या वेगळ्या कामाबाबत आणि एकूणच लोकसाधनेच्या प्रकल्पाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. व पुढे एकत्र मिळून काम करण्याची इच्छाही व्यक्त केली.

यावेळी राहुल देसाई उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी, सुनील खरात

कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी, गणेश मंडलिक गट विकास अधिकारी दापोली, विकास मुळीक जिल्हा शेती अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी, प्रतीक फडतरे कृषी अधिकारी एम. आर. इ.जी. एस. जिल्हा परिषद रत्नागिरी. अण्णासाहेब बळवंतराव गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती दापोली, मर्चंडे साहेब सहाय्य गट विकास अधिकारी पंचायत समिती दापोली इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन जोपसावा : सिताराम खिलारी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेतील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालयात इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (खडठज) या भारतीय अंतराळ संस्थेमार्फत स्पेस ऑन व्हील ही फिरती बस आली असता बस मधील चांद्रयान, मंगळयान यासाठी लागणारे लॉन्च पॅड आणि स्पेस सेंटर मधील लावलेले शोध हे प्रयोग विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी याचे उदघाटन करताना संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सन्मा. सिताराम आण्णा खिलारी बोलत होते. ते म्हणाले की विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासाला पाहिजे. वैज्ञानिक शोध लावले पाहिजे, इस्रो ही आपली अंतराळात काम करणारी संस्था आहे, या संस्थेमुळे आज भारत देश स्पेस सेंटर मध्ये तसेच विज्ञाना मध्ये स्वयंपूर्ण बनला आहे. आज अमेरिका किंवा रशिया यांच्या मदतीची




भारताला आवश्यकता नाही. ही बस नवोदय विद्यालय व ढोकेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने या ठिकाणी आली होती. नवोदय विद्यालयाच्या काही विद्यार्थ्यांना या बस मधील प्रतिकृतींची माहिती देण्यासाठी ऑनलाईन ट्रेनिंग देण्यात आले होते. याप्रसंगी विज्ञान भारतीच्या सदस्या डॉ. मिना मालगावकर पुण्याहून उपस्थित होत्या.त्यांनी अतिशय सुंदर माहिती विदयार्थ्यांना दिली तसेच मार्गदर्शन केले. याप्रसंगी नवोदय विद्यालयाचे प्राचार्य, बोरसे एस. पी., उपप्रचार्य गजानन मुन्नरवार, विजय भोंडवे, अभिषेक कुमार, अक्षिता चौहान, ढोकेश्वर विद्यालयाचे प्राचार्य सुनिल वाव्हळ, प्रा. बाळासाहेब निवडुंगे कला विभाग समन्वयक विजय सोबले, शास्त्र समन्वयक अशोक गांगड, प्रा. भाऊसाहेब हिंगडे, सोनल रोहकले, निलम खिलारी, वैशाली गायखे, बाबासाहेब जाधव, संतोष इंगळे, मल्हारी वाघसकर, अतुल सैद, रवींद्र ज्योतिक, नारायण शेळके, संदीप महांडुळे, सुरेखा ठाणगे, प्रिया डव्हणे, रवींद्र मते, सुमन वाळुंज, प्रा गोवर्धन मते, प्रा. आतिष झावरे, प्रा. राजेंद्र वाघ, प्रा. शिवाजी नरसाळे, प्रा. पोपटराव जगदाळे, प्रा. सचिन महानवर, प्रा. योगेश मांडगे, प्रा. राजेंद्र ढोणे, सुशांत खेडकर, प्रा. नितीन ढोकळे, प्रा मंगेश पोपळघट, विष्णू भद्रे इत्यादी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भाऊसाहेब हिंगडे यांनी केले, प्रास्ताविक अशोक गांगड यांनी तर आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले.

# आ.काशिनाथ दाते यांचे कामोठेत भव्य स्वागत; पारनेरकर रहिवासी संघातर्फे पेढे तुला

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** रविवार, दिनांक ०८ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई, कामोठे येथे पारनेरकर रहिवाशी संघातर्फे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील आमदार काशिनाथ दाते यांची पेढे तुला व आमदार पदी निवड झाल्याबद्दल भव्य सत्कार आयोजित केला होता.

ॲड.पांडुरंग गायकवाड कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रदेशाध्यक्ष अक्षय शिंदे, वसंतराव चेडे, विजुभाऊ औटी, राजाराम एरंडे, उद्योजक गोरख रोहोकले, पंढरीनाथ उंडे, आर. एस.कापसे, भास्कर उचाळे, शिवाजी बेलकर, लक्ष्मण डेरे, देवराम मगर, भाऊसाहेब कवडे प्रमुख उपस्थितीत होते. यावेळी बोलताना आमदार दाते म्हणाले माझ्या लाडक्या बहिणींनी भरभरून मदत केली.



त्यांना विसरणार नाही. भविष्यात त्यांचे पंधराशे वरून एकवीशे रुपये करायचे आहे. तो निर्णय कदाचित नागपूरच्या अधिवेशनात होऊ शकतो. त्यासाठी मी सरकारच्या बाजूने आहे कामोठे, मुंबईकर नेहमी पारनेरच्या प्रत्येक लोकप्रतिनिधीच्या पाठीमागे ताकतीने उभे राहिलेत. माझ्या स्वतःच्या जिल्हा परिषद निवडणुकीत काम ठेकर माझ्याबरोबर ताकतीने उभे होते. मी स्व.आ. वसंतराव झावरे यांच्या विचारांचा वारसा घेऊन राजकारणात आलो आहे. सन १९७९ ते २००४ पर्यंत त्यांच्याबरोबर सावलीसारखा काम करत आलो. कै.मा.आ.शंकरराव काळेंपासून मी राजकारणात सगळ्याच लोकप्रतिनिधी बरोबर काम केले. राजकारणात काही मूल्य जपायला पाहिजे परंतु गेल्या काही दिवसापासून आपल्या तालुक्यात राजकारणाची पद्धत अतिशय वाईट झाली. ही निवडणूक मी शांतपणे उभे केली. नगर तालुक्यातील ४३ गावात मी गल्लोगल्ली फिरून काढले. मी माझ्या सत्तरीच्या वयात सुद्धा या तरुणांना चालताना ऐकत नसायचं एवढा जोश माझ्यामध्ये होता.

आमच्या महिलांच्या टीमने अतिशय चांगले काम केले. प्रत्येक घरात माझे निवडणुकीचे चिन्ह पोहोचवले. मी ही निवडणूक जनतेच्या सहकार्याने उभी केली व जिंकली माझी मायबाप जनता माझ्यावर प्रेम करणारे जेष्ठ असतील तरुण त्यांनी मनापासून ठरवलं होतं जनतेने एक सुप्त लाट तयार केली होती. माझी उमेदवारी आल्यावर मलाच मतदान करायचं असा ठाम विश्वास केला. त्यामुळे कितीही आमिष त्यांच्यापुढे गेली तरी जनतेच्या मतात बदल केला नाही. मला कामोठेकरांचा अभिमान आहे पारनेर तालुक्यातील तरुण या मायानगरीत तुम्ही पोट भरण्यासाठी आलात तरी तुमचं घारीसारखं चित्त आपल्या मतदारसंघात आहे. हा मला तुमचा सार्थ अभिमान आहे. तुम्ही येथे संघटन करता त्या संघटनाच्या माध्यमातून आपल्या गावाकडे काही तरी प्रगती झाली पाहिजे. या भावनांचा मला सार्थ अभिमान आहे. मला जेव्हा जेव्हा संधी मिळाली त्या संधीचं सोनं केलं मग बाजार समिती सभापती पद असो की जिल्हा परिषद बांधकाम समिती सभापती पद असो त्या पदांचा उपयोग जनतेची कामे करण्यासाठी केला. मला तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने, तरुणांच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या सर्वोच्च सभागृह जाण्याची संधी मिळाली. मला खूप उशिरा संधी मिळाली मला वारसा नव्हता माझे वडील आमदार नव्हते, शेतकरी, शेतमजूर होते, घरात माझ्या कुठल्याही पिढीत राजकारण नव्हतं, परंतु तरीदेखील सर्वसामान्य माणसांबरोबर माझे नाळ जोडलेली होती सन १९८० सालापासून मी जनतेत काम करत होतो. पेढेतुलाचे संतोष चौगुले व संजय आहेर यांनी आयोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्योजक धनंजय निमसे, जालिंदर खोसे यांनी केले.

## थोडक्यात

# नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वी

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.०८, नवी मुंबई :** महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने दिनांक ०८ डिसेंबर २०२४ रोजी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. नवी मुंबई महानगर पालिकेच्या २५ नागरी आरोग्य केंद्रांमार्फत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे दवाखाने, सोसायटी कार्यालये, रूग्णालये, रेल्वे स्टेशन, बस डेपो, बाजारपेठ, टोल नाके इत्यादी विविध ठिकाणी ६०९ स्थायी, ७५ ट्रांझिट व २७ फिरते मोबाईल असे एकूण ७११ पोलिओ लसीकरण बूथ स्थापन करण्यात आले.'दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी'या घोषवाक्यास अनुसरून घरोघरी जाऊन नागरी आरोग्य केंद्रांच्या मार्फत पोलिओ लसीकरण मोहीमेची जनजागृती करून पोलिओ लसीकरणाची माहिती पोहोचविण्यात आली. लसीकरण बूथवरील २ हजारहून अधिक कर्मचारी स्वयंसेवक यांच्यामार्फत बालकांना पोलिओ लस करण्यात आली. सदर दिवशी नमुंमपाचे ८३ टक्के इतके काम झाले आहे. १०० टक्के लाभार्थींना पल्स पोलिओ लस मिळावी याकरिता दि.०९ ते दि.१३ डिसेंबर २०२४ या कालावधीत घरोघरी जाऊन पल्स पोलिओ डोस देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ज्या बालकांना रविवार, दिनांक ०८ डिसेंबर रोजी बूथवर जाऊन डोस घेता आलेला नाही, अशा बालकांसाठी विशेष मोहीम राबविली जात असून घरांना भेट देणाऱ्या नमुंमपा मार्फत येणाऱ्या स्वयंसेवकांना संपूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार 'फार्मर आयडी'

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, ठाणे :** विविध योजनांचा लाभ ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणाम कारकरित्या पोहोचवता यावा यासाठी कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजीटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ॲग्रीस्टॅक (डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर एग्रीकल्चर) ही योजना राबविण्यात येत असून या योजनेचे प्रत्यक्ष काम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सुरू करावे, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिले.

केंद्र शासनाने ॲग्रीस्टॅक योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ॲग्रीस्टॅक हे कृषि क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणाम कारकरित्या पोहचण्यासाठी मदत होणार आहे. ॲग्रीस्टॅक संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी गट विकास अधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांचे नियोजन व कामकाजाकडे नियंत्रण असणार आहे. अशी माहिती कृषी विकास अधिकारी एम.एम. बाचोटीकर यांनी दिली. सर्व ग्रामपंचायतींमार्फत कॅम्प नियोजन करण्यात येणार असून शेतकऱ्यांना फार्मर आयडी तयार करून देणार आहेत.

शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच निर्मितीमध्ये पथकातील कर्मचारी प्राथमिक जबाबदारी पार पाडणार आहेत. कृषि क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा ॲग्रीस्टॅक उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे माहिती आधारित योग्य निर्णय घेणे, गरजू शेतकऱ्यांना योग्य वेळी सेवा प्रदान करणे, कृषि उपक्रमांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी शक्य होईल. विविध शेतकरी आणि कृषि-केंद्रित योजनांची आखणी करणे व अंमलबजावणी करणे सुलभ होणार आहे.

विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांना लाभ देताना आधार प्रणालीचा वापर करुन लाभार्थीची ओळख पटविण्यात येते. तसेच महसूल विभागाने त्यांच्याकडील अधिकार अभिलेखाचे तसेच गाव नकाशांचे संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे.

महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग संस्थेने राज्यातील जमिनींचे भू-संदर्भीकरण (जिओ रेफरन्सिंग) करुन दिले आहे. यामुळे शेत जमिनीची इत्यंभूत अद्यावत माहिती डिजिटाईज स्वरुपात तात्काळ उपलब्ध होणार असून ॲग्रीस्टॅक (डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर एग्रीकल्चर) ही योजना यशस्वीपणे राबवण्यासाठी शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

# मुदखेड येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.०९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील महात्मा गांधी उच्च माध्यमिक विद्यालयात दि.०९ डिसेंबर २०२४ रोजी ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले. यामध्ये शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांच्या अंगी शास्त्रज्ञ बनण्याची जिज्ञासा निर्माण होण्यासाठी म्हणून दरवर्षी तालुकास्तरीय पासून ते राज्यस्तरापर्यंत व पुढे देशपातळीपर्यंत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून नांदेड जिल्हा शिक्षण विभाग व पंचायत समिती मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य इमारतीमध्ये ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील एकूण ७६ प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. त्यात ६४ प्राथमिक तर १२ माध्यमिक विभागातील प्रयोग होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राम चौधरी यांनी केले तर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बाबुराव नाईक व प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्य.) माधव सलगर शिक्षणाधिकारी नियोजन दिलीप बनसोडे व मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, गटशिक्षणाधिकारी रुस्तुम आडे, विस्तार अधिकारी सुरेश पाटील तसेच महात्मा गांधी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी त्यात उपाध्यक्ष रामप्रसाद सोनी, कोषाध्यक्ष शंकरराव पचलिंग, शिक्षक प्रतिनिधी किरण देशपांडे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय शिप्परकर, शिक्षण मंडळाचे सचिव अशोक मोरे, मुख्याध्यापक विजय बेंबडे व तालुक्यातील अनेक शाळेचे मुख्याध्यापक, बालवैज्ञानिकासह विज्ञान शिक्षक यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. यावेळी प्रमुख अतिथींनी विज्ञान विषयावर सखोल असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञ बनण्याची जिद्द बाळगावी असे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील विज्ञान शिक्षक माधव कुलकर्णी, प्रा.दिनेश शेटे, संजय राजे, जितेंद्र गायकवाड, राम हेंबाडे, प्रभाकर नागरगोजे, प्रा.दत्तात्रय मंगनाळे, सूर्यकांत गोंड, पर्यवेक्षक प्रदीप बाविस्कर, ज्येष्ठ शिक्षक तथा माजी मंडळ सदस्य यशवंत कांबळे, हौसाजी गाढे, गणेश गोडसे, प्रा.प्रेम कुमार कौशल्य, प्रा.कदम, लाभशेटवार, जोरगुलवार, सोनटक्के इत्यादींनी सहकार्य केले. या कार्यक्रमास तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, धम्मा कांबळे यांनी सर्व प्रयोगाचे चित्रीकरण व मुलाखती घेऊन प्रदर्शनाची शोभा वाढवली. या विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षक म्हणून प्रा.डी.जी गरुडकर, रुद्रकंठवार, श्री पवळे यांनी काम पाहिले तर कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक राजीव हामंद यांनी केले. तर आभार उपप्राचार्या अभया लोहगांवकर यांनी मानले.

# जिल्हा परिषदेच्या २३ निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, ठाणे :** जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने प्रत्येक महिन्यात आनंददायी निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडला.

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ.समीर तोडणकर यांच्या शुभहस्ते २३ अधिकारी व कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, पेन्शन आदेश देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.समीर तोडणकर यांनी सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्याकरिता सदिच्छा दिल्या. त्याचबरोबर ग्रामीण भागात ३८ पेक्षा अधिक काळ काम काज केल्याबद्दल अभिनंदन केले. आरोग्य, शिक्षण तसेच विविध शासकीय योजना ग्रामस्थापर्यंत पोहोचवण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचारी यांनी मोलाचे काम काज केले आहे. यापुढे सेवानिवृत्ती नंतर स्वतः साठी आणि उत्तम आरोग्यासाठी वेळ द्या, अशा सदिच्छा दिल्या.



प्राथमिक शिक्षक जयदिप देशमुख व मिठाराम बोंद्रे यांनी जिल्हा परिषदेत सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार कार्यक्रम नियोजन केल्याबद्दल आभार व्यक्त केले. ३८ वर्ष शिक्षक म्हणून कामकाज करता विद्यार्थ्यांना शेवटच्या दिवसापर्यंत शिकवण्याचा अनुभव समृद्ध करणारा होता, अशी भावना व्यक्त केली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी कल्पना तोरवणे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनोज देवकर तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ऑक्टोबर महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक ०७, सामान्य प्रशासन विभाग ०३, आरोग्य विभाग ०२ असे एकूण १२ तर नोव्हेंबर महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक ०९, आरोग्य विभाग ०२ असे जिल्हा परिषदेचे एकूण ११ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक, कनिष्ठ सहाय्यक, आरोग्य सहाय्यक महिला, वाहन चालक, शिपाई या पदावरील अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.

# महसूल वाढीवर भर देण्याचे आयुक्तांचे निर्देश

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, नवी मुंबई :** महानगरपालिकेचे लोकार्पण झालेले प्रकल्प, इमारती उपयोगात असल्याची खात्री संबंधित विभागाने करून घ्यावी व अद्याप कार्यान्वित न झालेल्या नागरी सुविधा तत्परतेने वापरात येतील याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे आणि याबाबतचा आढावा घेऊन त्याचा तपशील सादर करावा असे निर्देश देत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत सद्यस्थितीत सुरु असलेल्या व नियोजित असलेल्या सुविधा कामांचा आणि प्रकल्पांचा बाबनिहाय आढावा घेतला. मालमत्ता विभागाने महानगरपालिकेच्या पूर्ण झालेल्या मात्र सध्या वापरात नसलेल्या इमारती, वास्तू अशा मालमत्तांची यादी त्वरित तयार करावी आणि वापरात नसलेल्या वास्तू वापरात येण्यासाठी संबधित विभागांशी समन्वय साधावा आणि मालमत्ता वापरात येण्याच्या दृष्टीने पुढाकार घेऊन काम करावे असे आयुक्तांनी निर्देशित केले.

या वास्तू तत्परतेने वापरात आणण्याची जबाबदारी संबधित विभागप्रमुखाची राहील असे स्पष्ट करीत आयुक्तांनी त्यातही प्राधान्याने तयार असलेले मार्केट वापरात येतील याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे असे निर्देश दिले. दिव्यांग व्यक्ती, महानगरपालिकेच्या इटीसी केंद्रातून व्यवसाय प्रशिक्षित झालेले दिव्यांग तसेच महिला बचतगट यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना खात्रीशीर बाजारपेठ मिळण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या मार्केटमधील किमान ३० टक्के जागा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

# 'जलजीवन मिशन'ची कामे समन्वयाने करा - जिल्हाधिकारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, छत्रपती संभाजीनगर :** हर घर नल से जल उपलब्ध करुन देण्यासाठी जल जीवन मिशन ही योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत जिल्ह्यात ११६४ कामे सुरु करण्यात आली असून ६३५ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वय साधावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज यंत्रणांना दिले.




जलजीवन मिशन संदर्भात सोमवार, दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, कार्यकारी अभियंता वाघमारे, तसेच सर्व यंत्रणा प्रमुखआदी उपस्थित होते. जिल्ह्यातील जलजीवन मिशन संदर्भातील कामांचा आज आढावा घेण्यात आला.

जिल्ह्यात जलजीवन मिशनची ११६४ कामे सुरु करण्यात आली. त्यापैकी ६३५ कामांची भौतिक प्रगती झाली आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली आहे. तथापि, उर्वरित कामे मात्र किरकोळ तांत्रिक सोपस्कारांअभावी प्रलंबित दिसत आहेत. त्यासाठी आवश्यक ना- हरकत पत्रे, दाखले इ. ची पूर्तता करून कामांची पूर्तता करुन घ्यावी. त्यासाठी सर्व विभागांनी आपापसात समन्वय राखावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पाटबंधारे विभाग, महावितरण, ग्रामविकास विभाग इ. विभागांचे अधिकारी उपस्थित होते.